**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०५.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

श्री. ओमप्रकाश यादव (मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ)यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४०वी बैठक दिनांक ०३.०५.२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. कामगार भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| २. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ३. | श्री प्रशांत राठोड (कक्ष अधिकारी, काम-७) | उपसचिव (शासकीय प्रतिनिधी यांचे प्रतिनिधी) |
| ४ | श्री. दत्तात्रय पाथकर (उपसंचालक प्रशासन) | संचालक लेखा व कोषागारे (शासकीय प्रतिनिधी यांचे प्रतिनिधी) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |

Desk-३०/SKB/C.९

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात केली. व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांसंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

तद्नंतर विषयसुचीनुसार पुढील चर्चा करण्यात आली.

# बैठकीची विषयसूची

| अ.क्र. | विषय | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.** | मंडळाच्या दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या विशेष बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्व उपस्थितांनी मान्यता दिली. |
| २. | **मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहीम राबविण्यासाठी मंडळाच्या दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या बैठकीत ४ संस्थांमार्फत केलेल्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे, पात्र संस्थांचे दर पत्रक उघडणे** | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, दि. २८.०२.२०१७ रोजी मा. मंत्री. कौशल्य विकास व उदयोजगता, कामगार भुंकप, पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाची सहयाद्री अतिथीगृह येथे दि. २८.०२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत वृक्षलागवड मोहिमेप्रमाणे (Tree-plantation) मंडळाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी दिनांक २५ एप्रिल ते १ मे या कालावधीत "जनजागृती सप्ताह" आयोजित करण्यात यावा. त्यामध्ये मुख्यालय स्तरावर एक मोठा Event आयोजित करण्यात यावा. तसेच प्रत्येक जिल्हा कार्यालय स्तरावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. सदर Event ची विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच रेडिओ जिंगल्स, एस.टी. बसेस व एस.टी स्टँड वर होर्डींग्ज लावणे, फिरत्या वाहनांद्वारे मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे, तसेच बांधकामाच्या ठिकाणी व कामगारांच्या नाक्यावर मंडळाच्या योजनांचे मोठे फलेक्स लावणे, मंडळाच्या योजनांबाबतचे पुस्तक वाटप करणे, इत्यादीमार्फत मंडळाच्या योजनांची जनजागृती करण्यात यावी. असा |

Desk-३०/SKB/C.१

| | |
|---|---|
| **व त्यानुसार योग्य संस्थेची निवड करणे.** | ठराव मंजूर करण्यात आला.<br>त्यानुसार वनविभागातील वृक्षलागवड (Tree-plantation) मोहिमेचे Event Management केलेल्या संस्थेची माहिती प्राप्त केली असता MTDC च्या पॅनलवरील १० संस्थांपैकी एका संस्थेची निवड करण्यात आली होती असे वनविभागाकडून कळले त्याच धर्तीवर मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार मंडळाचे सल्लागार (Consultant) मे. KPMG कडून EOI चे प्रारुप तयार करून MTDC च्या पॅनलवरील १० संस्थांना दिनांक १५.०४.२०१७ रोजी EOI सादरीकरण करणेबाबत सुचना देण्यात आली. त्याअनुषंगाने १० संस्थांपैकी खालील चार संस्थांनी दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीत सादरीकरणासाठी सहभाग घेतला होता. |

| Sr. No. | Agency Name |
|---|---|
| १. | Goldmine Advertising Pvt. Ltd. (गोल्डमाईन ॲडव्हर्टायजींग प्रा.लि.) |
| २. | Percept D. Mark (परसेप्ट डि-मार्क) |
| ३. | Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.) |
| ४. | Working Elements (वर्किंग इलमेंट) |

सदर बैठकीत उपरोक्त संस्थानी प्रत्येकी रु. १ लक्ष अनामत रक्कम (धनाकर्ष स्वरुपात), तांत्रिक लिफाफा (Technical Bid) आणि व्यावसायिक लिफाफा (Commercial Bid) सादर केला होता.

त्यानुसार मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहीम राबविण्यासाठी मंडळाच्या दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या बैठकीत ४ संस्थांमार्फत केलेल्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे, पात्र संस्थांचे दर पत्रक उघडणे व त्यानुसार योग्य संस्थेची निवड करणे प्रस्तावित होते.

सदर, तांत्रिक बोली (Technical Bid) खुली झाल्यानंतर सर्व कागदपत्रांची छाननी करून अहवाल मंडळास सादर करण्यासाठी IT Consultant KPMG च्या प्रतिनिधींकडे देण्यात आले होते. कागदपत्रांची छाननी करण्यास वेळ लागणार असल्याने सबंधित संस्थांना दुरध्वनीद्वारे व ई-मेलद्वारे पुढील कार्यवाहीबाबत कळविण्यात येईल, असा ठराव दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला होता.

मा. अध्यक्ष यांची परवानगी घेऊन मंडळाचे Consultant KPMG चे प्रतिनिधी यांना तांत्रिक कागदपत्रांच्या छाननीचा अहवाल सादर करण्याच्या सुचना मंडळ सचिव यांनी दिल्या. त्यानुसार मे. KPMG यांनी तांत्रिक कागदपत्रांची छाननी करून बैठकीत उपस्थित मंडळाच्या सदस्यांबरोबर तांत्रिक बाबींवर व सादरीकरणाबद्दल चर्चा केली व त्यानुसार मंडळाच्या सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार मुल्यमापन करुन गुण निश्चित करण्यात आले. त्यानुसार ४ संस्थांना प्राप्त गुणांचा तपशिल व पात्रतेबाबतचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

| Sr. No. | Agency Name | Marks | Remark |
|---|---|---|---|
| १. | Goldmine Advertising Pvt. Ltd. (गोल्डमाईन ॲडव्हर्टायजींग प्रा.लि.) | ८० | Qualified |
| २. | Percept D. Mark (परसेप्ट डि-मार्क) | ० | Disqualified |
| ३. | Working Elements (वर्किंग इलेमेंट) | ७५ | Qualified |
| ४. | Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.) | ९० | Qualified |

उपरोक्त ४ संस्थांपैकी पात्र ३ संस्थांचे दरपत्रक संस्थाचे प्रतिनिधी व मंडळाच्या सदस्यांच्या समक्ष उघडण्यात आले. पात्र ३ संस्थांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Agency Name | Bid Amount (In Rs.) |
|---|---|---|
| १. | Goldmine Advertising Pvt. Ltd. (गोल्डमाईन ॲडव्हर्टायजींग प्रा.लि.) | २,२५,०७,०१०/- |
| २. | Working Elements (वर्किंग इलेमेंट) | ३,३४,८४,५००/- |
| ३. | Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.) | १,८३,२५,५०१/- |

EOI मध्ये नमुद केलेल्या अट क्र.३.३.३ नुसार तांत्रिक गुणांना ७०% Weightage व दरपत्रकास ३०% Weightage देवून Composite Score च्या आधारे Most Responsive Bidder ची निवड करणे

अपेक्षित आहे. त्यानुसार Composite Score चा तपशिल खालीलप्रमाणे:

| Bidder | Technical Marks | Weighted Technical Score | Commercial Bid | Relative Commercial Score | Weighted Financial Score | Total Composite Score |
|---|---|---|---|---|---|---|
| Formula | A | B=Ax७०% | C | D=१००*(Lowest Bid/Bid) | E=Dx३०% | F=B+E |
| Goldmine | ८० | ५६ | २२,५०७,०१०/- | ८१ | २४ | ८० |
| Working Elements | ७५ | ५३ | ३,३४,८४,५००/- | ५५ | १६ | ६९ |
| Zapak | ९० | ६३ | १,८३,२५,५०१/- | १०० | ३० | ९३ |

उपरोक्त Composite Score च्या आधारे **मे. Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.)** यांची मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांसाठी 'जनजागृती मोहिम' राबविण्यासाठी निवड करण्याचे ठरविण्यात आले. सदर जनजागृती मोहिम राबविण्यासाठी निवड केलेली संस्था व अपेक्षित खर्चाचा तपशिल शासनास सादर करून शासन मान्यतेअंती मे. Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.) यांना स्वीकृतीपत्र देण्यात येईल व जनजागृती मोहिमेमध्ये अंतर्भूत करावयाच्या बाबी, जनजागृती मोहिमेचे वेळापत्रक इ. सबंधी मंडळ स्तरावर निर्णय घेऊन कार्यादेश देण्यात येतील, असे सर्वानुमते ठरले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव: मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावानुसार वनविभागातील वृक्ष लागवड (Tree Plantation) मोहिमेच्या धर्तीवर संस्था निश्चितीसाठी MTDC च्या पॅनल वरील १० संस्थांकडून EOI मागविण्यात आले. EOI सादर केलेल्या ४ संस्थांपैकी पात्र ३ संस्थांचे तांत्रिक दस्तऐवज व दरपत्रकाचे Composite Score नुसार मे. Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.) यांची मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांच्या जनजागृतीतील मोहिम राबविण्यासाठी निवड करण्याचे ठरविण्यात आले व जनजागृती मोहिमेमध्ये प्रथम टप्प्यात नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे व मुंबई या विभागीय स्तरावर जनजागृती मोहिम हाती घ्यावी व या मोहिमेत अंतर्भूत करावयाच्या बाबी, जनजागृती मोहिमेचे वेळापत्रक इ. सबंधी मंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल. तसेच जनजागृती मोहिम राबविण्यासाठी निवड करण्यात आलेली संस्था व प्रस्तावित रु.१,८३,२५,५०१/-खर्चाचा प्रस्ताव त्वरीत शासनास सादर करून मान्यता प्राप्त झाल्यावर संबंधित संस्थेस कार्यादेश देण्यात यावेत. तद्नंतर राज्यातील अन्य जिल्हयातही जनजागृती मोहिम निवड केलेल्या संस्थेमार्फत मंजूर दराने राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात

| | | |
|---|---|---|
| | | आला. |
| ३ | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडे जमा उपकराच्या रकमा बँकेत ठेव स्वरुपात गुंतवणुकीचा तपशील सादर करणे.** | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दिनांक २७.१०.२०१५ नुसार राज्य सार्वजनिक उपक्रमातील अतिरिक्त निधीची गुंतवणूक शेडयुल्ड बँक पैकी स्टेट बँक व त्याची असोसिएट बँक, राष्ट्रीयकृत बँक व किमान नक्त मत्ता ४००० कोटी नक्त मत्ता (Net Worth) असलेल्या बँकेत करता येते. तसेच बँकेच्या नक्त मुल्याच्या १५% पेक्षा अधिक निधी एका बँकेत गुंतवू नये या व इतर मार्गदर्शक तत्वे व सूचना शासन निर्णयात नमूद आहेत.<br><br>त्यानुसार मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये मंडळाचा अतिरिक्त निधी शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासनाने मान्यता दिलेल्या खाजगी बँका मध्ये मंडळास गुंतवणूक करता येईल असा ठराव घेण्यात आला होता .<br><br>मंडळाच्या उपसमितीच्या दिनांक ०४.०१.२०१७ रोजी झालेल्या गुंतवणूकीच्या बैठकीमध्ये सदर ठरावाच्या अनुषंगाने खाजगी शेडयुल्ड बँकांना गुंतवणूकीमध्ये सहभागी करुन घेण्यात आले होते व त्यानुसार सदर क्षेत्रातील इंडसइंड बँकेमध्येरु. १००० कोटी व येस बँकेमध्ये रु. ५०० कोटीद.सा.द.श. ६.५०% या व्याजदरावर गुंतवणूक करण्यात आलेली होती.<br><br>मार्च २०१६ अखेर मंडळाचा अतिरिक्त निधी मुळ रक्कम रु ३०५० कोटी (तीन हजार पन्नास कोटी) |

खालील राष्ट्रीयकृत व खाजगी शेडयुल्ड बँकामध्ये एक वर्षासाठी गुंतवणूक करण्यात आली आहे.

| अनु क्र. | बँकचे नाव | FDR No | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वतेनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बँक | L०९०३७९ | २२.०६.२०१६ | २२.०६.२०१७ | ५०० | ७.०० | ५३५.९२ |
| २ | युको बँक | ०९७२६९ | २४.०६.२०१६ | २४.०६.२०१७ | ८५० | ७.०५ | ९११.५३ |
| ३ | युनियन बँकऑफ इंडिया | २४१००१ | २४.०६.२०१६ | २४.०६.२०१७ | २०० | ७.०५ | २१४.४८ |
| ४ | इंडसइंड बँक | ३००७१७६ ५६८३६ | ०४.०१.२०१७ | ०४.०१.२०१८ | १००० | ६.५० | १०६६.६० |
| ५ | येसबँक | ०२६८४०४ ००००८२१५ | ०४.०१.२०१७ | ०४.०१.२०१८ | ५०० | ६.५० | ५३३.३० |
| | | एकूण | | | ३०५० | | ३२६१.८४ |

मंडळाची अतिरिक्त गुंतवणूक ज्या बँकात करण्यात आलेली आहे त्या बँकाना प्रत्येक महिन्याला मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/ तारण/ ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र देणेबाबतचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार वरील मुदत ठेव गुंतवणूक केलेल्या बँकानी माहे मार्च २०१७

पर्यंतच्या ठेवींबाबत त्यांच्याकडील मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणूक रक्कम सुरक्षित असून त्यावर कोणतेही कर्ज/ तारण नसल्याचे प्रमाणपत्र ई-मेल व हार्डकॉपीद्वारे सादर केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अनु क्र. | बँकेचे नाव | गुंतवणूक केलेली रक्कम (कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे. | मुदत ठेव पावती क्र. | मुदत ठेव सुरक्षित असल्याचे बँकेचे प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ५०० | ७.०० | L०९०३७९ | ११.०४.२०१७ |
| २ | युको बँक | ८५० | ७.०५ | ०९७२६९ | १७.०४.२०१७ |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | २००/- | ७.०५ | २४१००१ | १२.०४.२०१७ |
| ४ | इंडसइंडबँक | १००० | ६.५० | ३००७१७६५६८३६ | ०१.०४.२०१७ |
| ५ | येसबँक | ५०० | ६.५० | ८४०४००००८२१५ | ०५.०४.२०१७ |

Desk-३०/SKB/C.९

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | ३०५० | | | |

मंडळाच्या उपसमितीच्या दि.०२.०५.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये राष्ट्रीयकृत व खाजगी शेडयुल्ड बँकामध्ये गुंतवणूक करताना खालील **निकष** ठरविण्यात आलेले आहे

१. राष्ट्रीयकृत बँक व खाजगी शेडयुल्ड बँकेत गुंतवणूक करताना ६०:४० या प्रमाणात करावी.

२. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बँकेतील गुंतवणूक एकूण रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.

३. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.

मंडळाच्या गुंतवणूकीवरील व्याजाच्या रकमा मुदत ठेव संपल्यानंतर एका वर्षानंतर प्राप्त करण्याऐवजी दर तिमाहीला प्राप्त करण्याबाबत उपसमितीच्या सदस्यांमध्ये चर्चा होवून गुंतवणूकीवरील व्याज तिमाही प्राप्त [illegible] मंडळाचे व्याजाचे नुकसान होते. त्यामुळे पुर्वीप्रमाणे मुदत ठेव गुंतवणूकीवरील व्याज [illegible] मुदत ठेव परिपक्व होतानाच प्राप्त करुन घ्यावे असे ठरले.

दिनांक ०२.०५.२०१७ रोजी २६५० कोटी इतका निधी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होता.उपसमितीच्या उपरोक्त निकषानुसार दि. ०२.०५.२०१७ रोजी खालीलप्रमाणे राष्ट्रीयकृत व खाजगी क्षेत्रातील शेडयुल्ड बँकेत गुंतवणूक करण्यात आलेली आहे

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम | व्याजदर द.सा.द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वतेनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | | ०२.०५.२०१७ | | १००० कोटी | ५.१० | |
| २ | एच.डी.एफ.सी. बँक | | ०२.०५.२०१७ | | १००० कोटी | ६.९१ | |
| | | | **एकूण** | | **२००० कोटी** | | |

उपसमितीच्या मान्यतेने मंडळाच्या रु. **५०५० कोटी (पाच हजार पन्नास कोटी)** एवढया अतिरिक्त निधीची गुंतवणूक उपरोक्त तपशिलानुसार वेळोवेळी केलेली आहे व मंडळाच्या उपसमितीने मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक करण्यासाठी निश्चित केलेल्या उपरोक्त निकषास मंडळाची मान्यता प्रस्तावित आहे.

त्याचप्रमाणे सध्या मंडळाकडे ६५० कोटी रुपये गुंतवणूकीसाठी उपलब्ध असून दिनांक ०४.०३.२०१७ रोजी मुदत ठेव गुंतवणूक बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीच्या सुरक्षिततेबाबत दरमहा प्रमाणपत्र संबंधीत बँकाकडून प्राप्त करुन मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त याच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येईल

तसेच **शासन निर्णय दि. २७.१०.२०१५** मध्ये नमूद तरतूदीनुसार मंडळाकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीचा तपशिल व त्यावर प्राप्त झालेल्या व्याजाचा त्रैमासिक अहवाल प्रशासकीय विभागास सादर करण्यात येईल.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या उपसमितीच्या बैठकीत राष्ट्रीयकृत व खाजगी शेडयुल्ड बँकांमध्ये करण्यात आलेल्या एकूण रु. ५०५० कोटीच्या गुंतवणूकीस व गुंतवणूकीच्या व्याजदरास मान्यता देण्यात येत आहे. उपसमितीने शिफारस केल्याप्रमाणे मंडळाच्या भविष्यातील गूंतवणूकीकरीता खालीलप्रमाणे निकष मंजूर करण्यात येत आहेत:**

**१. राष्ट्रीयकृत बँक व खाजगी शेडयुल्ड बँकेत गुंतवणूक करताना ६०:४० या प्रमाणात करावी.**

**२. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बँकेतील गुंतवणूक एकूण रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.**

**३. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.**

**४. मंडळाची गुंतवणूक करताना उपरोक्त ६०:४० या प्रमाणात गुंतवणूकीस राष्ट्रीयकृत /**

| | | |
|---|---|---|
| | | खाजगी शेडयुल्ड बँकेकडून प्रतिसाद न मिळत असल्यास किंवा रु. १००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक होणार असल्यास त्यादिवशीची प्रस्तावित गुंतवणूक स्थगित ठेवावी व तदनंतरच्या बैठकीत विचारात घ्यावी.<br>मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/ तारण/ओव्हरड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र दरमहा प्राप्त करावे व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ मधील तरतूदीनुसार मंडळाच्या गुंतवणूकीचा त्रैमासिक अहवाल प्रशासकीय विभागास सादर करण्यात यावा. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. |
| १६. | आयत्या वेळचे विषय. | **विषय क्र.१: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळामध्ये करण्याबाबत.**<br>याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये मनरेगा योजनेंतर्गत मागील १२ महिन्यात "**बांधकाम क्षेत्रात**" कमीत कमी ५० दिवस काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी करून घेण्याबाबत दि. १२.०७.२०१३ रोजीचे केंद्र शासनाचे पत्र मंडळास प्राप्त झाले होते.<br>केंद्र शासनाच्या उक्त पत्रान्वये मंडळाच्या दि. ०३.०९.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये मनरेगा योजनेंतर्गत बांधकाम क्षेत्रात मागील १२ |

महिन्यात कमीत कमी ५० दिवस काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी करून घेण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता. मंडळाच्या सदर ठरावानूसार कार्यवाही करण्याबाबत सर्व विभागीय/जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले होते.

तथापि, याबाबत शासनाचे दि.२०.०३.२०१७ रोजीच्या पत्रासोबत श्री. ए. के. सिंग, अवर सचिव, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दि.१०.०२.२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

सदर पत्रान्वये केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मागील १२ महिन्यात ५० दिवस काम पूर्ण करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळांतर्गत लाभार्थी म्हणून करण्याकरीता दिलेल्या निदेशांबाबत फेरविचार करून सदरचे निर्देश मागे घेतले असून सदर कामगारांच्या नोंदणीबाबत इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १२ (१) प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

केंद्र शासनास दिनांक २८.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १२.०७.२०१३ च्या केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ५० दिवस काम केलेल्या साधरणतः ५ हजार कामगारांची नोंदणी ग्राहय धरावी की रद्द करावी याबाबत केंद्र शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

Desk-३०/SKB/C.१

**ठराव: मंडळ सदस्यांनी उपरोक्त कार्यवाहीची नोंद घेवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.२:मंडळाचा उपकर जमा करण्यासाठी व जमा उपकराची रक्कम गुंतवणुक करण्यासाठी व्यावसायिक क्षेत्रातील शेडयुल्ड बँकांमध्ये स्वतंत्र बचत खाते उघडण्याबाबत.**

यावाबत मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दिनांक ०७.१०.२०१३ रोजीच्या बैठकीमधील ठरावानुसार शासन अधिसुचना क्र. डी.सी.ए. १२००७/(सी.आर ७७८) कामगार - ७ दिनांक ०४.०८.२००७ नुसार उपकराची रक्कम बँक खात्यात जमा करण्यासाठी बँक ऑफ इंडिया ताडदेव रोड व दिनांक ०८.१२.२०११ च्या मंडळाच्या ठरावानुसार बँक ऑफ महाराष्ट्र येथे चालु खाते उघडण्यात येऊन त्याप्रमाणे उपकराची रक्कम सदर खात्यांवर जमा करण्यात येते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (CAG) यांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात उपरोक्त चालु खात्यांवर कोणत्याही प्रकारचे व्याज प्राप्त होत नसल्याबाबत आक्षेप घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने उपरोक्त बँकामध्ये मंडळाची बचत खाती उघडण्यात आली व दररोज जमा होणाऱ्या चालु खात्यावरील उपकराची रक्कम बचत खात्यावर नियमित वर्ग करण्यात येते. त्याचप्रमाणे शासनाच्या दिनांक २३.०९.२०१६ च्या पत्रान्वये उपकराची रक्कम जमा करण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथे बचत खाते उघडण्यात आले. उपरोक्त सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या बचत खात्यावर जमा होणाऱ्या उपकराच्या रक्कमेवर ४% दराने व्याज प्राप्त होतो.

मंडळाकडे नोंदित कामगारांची नोंदणी फी व नुतणीकरणाची वर्गणी सेंट्रल बँक ऑफ इंडिया वांद्रा या बँकेतील बचत खात्यावर जमा होत असते व सदर जमा रक्कमेवर ४% दराने व्याजदर प्राप्त होत असतो.

शासन वित्त विभाग निर्णय क्र.शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/साउ. दिनांक २७.१०.२०१५ मधील सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची उपसमितीची बैठक आयोजित करून जास्तीत जास्त व्याजदर प्राप्त राष्ट्रीयकृत व व्यावसायिक क्षेत्रातील खाजगी शेडयुल्ड बँकामध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये सार्वजनिक उपक्रमातील अतिरिक्त निधीची गुंतवणूक ही खाजगी क्षेत्रातील शेडयुल्ड बँक ज्यांची नक्त मत्ता ४००० कोटी पेक्षा जास्त आहे त्या बँकेत त्यांच्या नक्त मुल्याच्या १५% च्या मर्यादेत मंडळाच्या अतिरिक्त निधीची ठेव गुंतवणूक करण्यात यावी, असा ठराव संमत करण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीच्या ठेवींची परिपक्व झालेली रक्कम सुध्दा मंडळाच्या बँक ऑफ इंडिया येथील बचत खात्यावर पुढील गुंतवणूकीच्या उपसमितीची बैठक होइपर्यंत ४% या व्याजदरानेच ठेवण्यात येते.

Desk-३०/SKB/C.१

तथापि, मंडळाच्या दिनांक ०२.०५.२०१७ रोजी झालेल्या मुदत ठेव गुंतवणूकीच्या बैठकीच्या अनुषंगाने काही व्यावयसायिक क्षेत्रातील शेयुल्ड बँकांनी मंडळाकडे बचत खाते उघडण्याबाबतचे प्रस्ताव सादर केलेले आहेत.

सदर प्रस्तावामध्ये त्यांनी उपरोक्त मंडळाच्या राष्ट्रीयकृत बँकेतील खात्यावर जमा होणाऱ्या उपकराची रक्कम व मुदत ठेव गुंतवणूकीची परिपक्व झालेली रक्कम त्यांच्याकडाल बचत खात्यावर १ कोटीपेक्षा जास्त रक्कम जमा केल्यास प्रतिवर्ष ६.५०% या दराने व्याजदर देण्याचे प्रस्तावित केले आहे.

मंडळाकडील जमा होणाऱ्या उपकराच्या अतिरिक्त निधीची रक्कम व मुदत ठेव गुंतवणूकीची परिपक्व झालेली रक्कम पुढील मुदत ठेव गुंतवणूकीच्या उपसमितीची बैठक होईपर्यंतच्या कालावधीमध्ये मंडळाची बचत खाती असलेल्या राष्ट्रीयकृत बँकाकडून ४% दराने व्याजदर प्राप्त होत आहे. परंतू वरीलप्रमाणे सदर निधी व्यावसायिक क्षेत्रातील शेयुल्ड बँकांमधील बचत खात्यात ठेवल्यास ६.५० या दराने व्याज प्राप्त होणार आहे. व त्यामध्ये मंडळाचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक हित आहे.

मंडळाकडील जमा होणाऱ्या उपकराच्या अतिरिक्त निधीची रक्कम व मुदत ठेव गुंतवणूकीची परिपक्व झालेली रक्कम व्यावसायिक क्षेत्रातील शेडयुल्ड बँकांमध्ये जमा करण्यासाठी स्वतंत्र खाते

Desk-३०/SKB/C.९

उघडणे प्रस्तावित आहे.त्यानुसार विविध बँकाकडून प्रस्ताव मागवून अधिकतम व्याजदर देणाऱ्या बँकामध्ये बचत खाते उघडण्यासाठी मंडळाची मान्यता असावी.

यावर बोलताना मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी सुचित केले की, सुरक्षिततेच्या दृष्टीने खाजगी बँकेऐवजी राष्ट्रीयकृत बँकेत मंडळाचे खाते असणे योग्य राहील. संचालक लेखा व कोषागार यांचे प्रतिनिधी श्री. दत्तात्रय पाथकर यांनी सुध्दा त्यास सहमती दर्शविली.

सद्यस्थितीत मंडळाचे बचत असलेल्या बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीकृत बँकेस विचारणा करून मंडळाच्या पुढील गुंतवणूकीपर्यंतची जमा रक्कम **Auto Sweep** (अॅटो स्वीफट) पध्दतीने त्याच बँकेत गुंतवणूक केल्यास प्राप्त होणारे व्याजदर व बँक ऑफ इंडियामध्ये जमा होणाऱ्या उपकर रक्कमेचा सविस्तर तपशिल बँकेस सादर करणेबाबत सूचित करण्यात यावे याबाबत बँक ऑफ इंडियाचा प्रतिसाद विचारात घेवून अन्य बँकेत बचत उघडणेबाबत विचार व्हावा, असे मत मंडळ सचिव यांनी व्यक्त केले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाचे खाते सन २००७ पासून बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेत आहे. सदर बचत खात्याची रक्कम बचत खात्याऐवजी त्याच बँकेत मंडळाच्या पुढील गुंतवणूकीपर्यंत Auto Sweep पध्दतीने गुंतवणूक करून जास्तीचा किती व्याजदर प्राप्त करता येईल, याबाबत बँक**

| | | |
|---|---|---|
| | | ऑफ इंडियास विचारणा करण्यात यावी. बँक ऑफ इंडिया या पध्दतीने इतर बँकेएवढा जास्तीचा व्याजदर देण्यास व मंडळाला आवश्यक उपकर जमेचा तपशिल सादर करण्यास सहमत नसल्यास अन्य राष्ट्रीयकृत व शेडयुल्ड बँकेकडून प्रस्ताव प्राप्त करून बचत खात्यावर अधिकतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एक बचत खाते उघडण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. |

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन विशेष बैठक संपल्याचे जाहिर केले.

*******************

मा. अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,
मुंबई

Desk-३०/SKB/C.९